**<u>मागासवर्गीयांची पदोन्नती व सरळसेवेमधील प्रतिनिधित्वाची माहिती संकलित करून त्यांचे शासन सेवेतील आरक्षण निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : २२ मार्च, २०२१.

<u>वाचा</u>:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.२००१/१८८७/प्र.क्र.६४ /०१/१६-ब, दि.२५ मे,२००४

**<u>प्रस्तावना-</u>**

मा. उच्च न्यायालय ,मुंबई यांनी रिट याचिका क्र. २७९७/२०१५ , महाराष्ट्र राज्य विरुद्ध श्री. विजय घोगरे व इतर या प्रकरणी दि. ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरवून पदोन्नतीमध्ये आरक्षणाची तरतूद असणारा संदर्भाधिन दि.२५ मे,२००४ चा शासन निर्णय रद्द केला आहे.राज्य शासनाने त्याविरूद्ध मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली असून सध्या ती प्रलंबित आहे. त्याअनुषंगाने मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यासाठी माननीय सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक ६१/२००२ एम. नागराज व इतर विरुद्ध भारत सरकार याप्रकरणी दिनांक १९ .१०. २००६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार मागासवर्गीयांच्या पदोन्नतीमधील प्रतिनिधित्वाची व अनुषंगिक माहिती संकलित करण्यासाठी तसेच विश्लेषणात्मक अभ्यास करण्यासाठी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:**

मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने एम. नागराजन विरुध्द भारत सरकार या प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे समितीची स्थापना करण्यात येत आहे-

| अ.क्र. | सदस्याचे पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ७ | प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग | सदस्य |
| ८ | सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा-**

१)राज्य शासनाच्या अखत्यारितील शासकीय/निमशासकीय कार्यालये, सेवामंडळ महानगरपालिका, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या आधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे यामधील मागासवर्गीयांच्या सरळसेवा व पदोन्नती मधील प्रतीनिधित्वाची माहिती गोळा करणे.

२) मागासवर्गीय जातींचा मागासलेपणा सिध्द करण्यासाठी माहिती गोळा करणे.

३) आरक्षणामुळे प्रशासकीय कार्यक्षमतेवर होणाऱ्या एकूण परिणामाचा अभ्यास करणे.

२. समितीने वरीलप्रमाणे संकलित माहितीचा विश्लेषणात्मक अभ्यास करून मागासवर्गीयांना शासन सेवेत पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यासाठी शासनास एक महिन्यात अहवाल सादर करावा.

३. सर्व प्रशासकीय विभाग व त्यांच्या अखत्यारीतील कार्यालयांनी समितीमार्फत वेळोवेळी मागणी करण्यात येणारी माहिती समितीस तातडीने उपलब्ध करून द्यावी.

४. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२१०३२२१५३०२७०६०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rasik Ambadas Khadse

Digitally signed by Rasik Ambadas Khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=41d02a5c663d2c05d362d4847bea4a1874fda4e9cb60284fb102fd7b9b3891b3, cn=Rasik Ambadas Khadse
Date: 2021.03.22 15:36:48 +05'30'

**(र. अं.खडसे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१.माननीय राज्यपाल यांचे सचिव,
२.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४.माननीय विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५.माननीय विरोधी पक्षनेता,विधानसभा
६.सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)
१३.सर्व जिल्हाधिकारी,
१४.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१६.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१७.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१८.प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१९.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०.सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२१.सचिव,राज्य माहिती आयोग,
२२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२३.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२४.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६.संचालक, समाजकल्याण, पुणे,
२७.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२८.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२९.संचालक, सेवायोजन, मुंबई,
३०. निवड नस्ती १६-ब